**मा.मुख्यमंत्री १५० दिवस कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा - सीईओ ओमकार पवार यांच्या सूचना**

**जिल्हा परिषद समन्वय सभेत सर्व पंचायत समित्यांचा आढावा**



**नाशिक**: जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी यांची समन्वय सभा पार पडली. या बैठकीत केंद्र व राज्य सरकारमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मारुती मुळे, इमारत व दळणवळण विभाग १ चे कार्यकारी अभियंता संदीप सोनवणे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल यांच्यासह सर्व विभागांचे विभाग प्रमुख व सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उपस्थित होते. श्री. पवार यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांची काटेकोर अंमलबजावणी हीच सर्वात महत्त्वाची बाब असून, यासाठी जिल्हा परिषदेचा यंत्रणा व सर्व पंचायत समित्यांचे अधिकारी यांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे. आगामी काळात सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन मा.मुख्यमंत्री यांच्या १५० दिवस कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना यावेळी दिल्या.

बैठकीदरम्यान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, भूमीहीन लाभार्थीसाठी घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना तसेच प्रधानमंत्री जनजाती अदिवासी न्याय अभियान (PM JANMAN) या योजनांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत "लखपती दिदी" उपक्रमाची अंमलबजावणी व प्रगती याबाबतही चर्चा झाली.

ग्रामपंचायत विभागाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. १५ वा वित्त आयोगाच्या तरतुदीनुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर निधीचा उपयोग, ड्रीम व्हिलेज संकल्पना, ग्रामपंचायतींना पुरविण्यात आलेले साहित्य, गट विकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांची ग्रामपंचायत तपासणी, जनसुविधा व तीर्थक्षेत्र विकास कामांचा अहवाल तसेच पीएम विश्वकर्मा, गतिशक्ती योजना याबाबत आढावा घेण्यात आला. तसेच शिक्षण विभाग

अंतर्गत आदर्श शाळा खोली बांधकाम, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा, पीएम श्री शाळांच्या निवडी व खर्च प्रगती यावर चर्चा करण्यात आली.

आरोग्य विभागाच्या दृष्टीने National Quality Assurance / Smart PHC योजना, जन्म-मृत्यू नोंदणी या बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला. याचबरोबर समाज कल्याण विभागाच्या योजना जसे की अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती विकास, मागासवर्गीय निधी खर्चाचे पालन यावर चर्चा झाली.

महिला व बाल विकास विभागांतर्गत कुपोषण निर्मूलन व उपाययोजना, ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशन, तसेच वित्त विभागात पंचायत राज समिती व स्थानिक निधी लेखा कार्यालयाचे प्रलंबित परिच्छेद यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले.

त्याचबरोबर ई-ऑफिसची अंमलबजावणी, सचिवालयाकडील प्रलंबित प्रकरणे व सन २०२४-२५ चा वार्षिक प्रशासन अहवाल सादरीकरणाबाबत सूचना देण्यात आल्या. पाणी व स्वच्छता विभागात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, सार्वजनिक शौचालये व "स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५-२६" या विषयांवर चर्चा झाली.

तसेच बांधकाम विभागातील पूर्ण व अपूर्ण कामांचा आढावा घेण्यात आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी सर्व गट विकास अधिकाऱ्यांना आपल्या-आपल्या पंचायत समित्यांतील योजनांची अंमलबजावणी वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच, शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा, असे देखील ओमकार पवार यांनी यावेळी नमूद केले. या बैठकीत उपस्थित विभागप्रमुखांनी आपल्या विभागांच्या कामकाजाचा आढावा सादर केला.